मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# रहाटणीतील नागरिकांचा प्रवास होणार सुखकर

## उड्डाणपुलामुळे नागरिकांची वाहतुकीची समस्या होणार दूर

**। पिंपरी-चिंचवड।**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**
पिंपरी परिसरातील नागरिकांची बऱ्याच वर्षांची वाहतुकीची समस्या दूर करण्यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने पिंपरी येथील डेअरी फार्म येथील मुंबई-पुणे रेल्वे फाटकावर ५६५ मीटर लांबीचा रेल्वे उड्डाणपूल उभारण्याचे काम प्रगतीपथावर आहे. दापोडी-निगडी रस्त्याला पॉवरहाऊस चौकाशी जोडणारा हा उड्डाणपूल झपाट्याने वाढणाऱ्या लोकसंख्येच्या वाढत्या मागणीला विचारात घेऊन उभारण्यात येत आहे. चार पदरी असणाऱ्या या उड्डाणपुलामध्ये छोट्या वाहनांसह अवजड वाहने पेलण्याचीही क्षमता असणार आहे. हा प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर पिंपरी, पिंपळे सौदागर, रहाटणी आणि आसपासच्या भागातील प्रवाशांचा प्रवास सोयीस्कर होणार आहे. या प्रकल्पामुळे नागरिकांना सुविधा, सुरक्षितता आणि इंधन बचतीच्या दृष्टीने फायदा होणार आहे.




रेल्वे उड्डाणपूल ही पिंपरी आणि आजूबाजूच्या परिसरातील लोकांची दीर्घकाळापासूनची मागणी होती. उड्डाणपुल नसल्याने या भागातील नागरिकांना वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत आहे आणि रेल्वे फाटकावर दीर्घकाळ प्रतीक्षा करावी लागत आहे. या उड्डाणपुलाच्या उभारणीनंतर नागरिकांच्या या समस्या दूर होणार असून पुणे मुंबई महामार्गावर तसेच तुकाराम नगर मेट्रो स्टेशनपर्यंत जलद आणि सहज पद्धतीने प्रवास करण्यासाठी मदत होणार आहे. या प्रकल्पामुळे परिसरातील हवा प्रदूषण तसेच ध्वनी प्रदूषणही कमी होणार आहे. वाहतूक कोंडी कमी करण्याबरोबरच वृक्षांचे पुनर्रोपण करून आणि आजूबाजूच्या परिसंस्थेला येणाऱ्या अडचणी कमी करून पर्यावरणविषयक समस्यांचे निराकरण करणे हे या प्रकल्पाचे उद्दिष्ट आहे. नैसर्गिक पर्यावरणाचे महत्व समजून घेऊन बांधकाम प्रक्रियेचा स्थानिक वनस्पती आणि जीवजंतूंवर होणारा परिणाम कमी होण्याच्या दृष्टीने महापालिकेने सक्रीय उपाययोजना केल्या आहेत. संरक्षण खात्याच्या जमिनीवर असलेल्या झाडांचे मूल्यांकन करून वृक्ष प्राधिकरण समितीने पुनर्रोपण तसेच वृक्षतोडीस मान्यता दिली आहे. यामध्ये मुख्यतः सुबाभूळ, बाभूळ, गुलमोहर आणि रेनट्री या वृक्षांचा समावेश आहे. तसेच महापालिकेच्या वतीने ६४ झाडांचे पुनर्रोपण करण्यात येणार आहे.उड्डाणपुल नसल्याने या भागातील नागरिकांना वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत आहे आणि रेल्वे फाटकावर दीर्घकाळ प्रतीक्षा करावी लागत आहे. या उड्डाणपुलाच्या उभारणीनंतर नागरिकांच्या या समस्या दूर होणार असून पुणे मुंबई महामार्गावर तसेच तुकाराम नगर मेट्रो स्टेशनपर्यंत जलद आणि सहज पद्धतीने प्रवास करण्यासाठी मदत होणार आहे. या प्रकल्पामुळे परिसरातील हवा प्रदूषण तसेच ध्वनी प्रदूषणही कमी होणार आहे.

# डॉ. कोल्हे यांनी मांडला कार्य अहवालाद्वारे लेखाजोखा

## मागील ५ वर्षात काय केलं याची आढावा मतदारांसमोर मांडला

**। पिंपरी-चिंचवड।**
मागील निवडणूक प्रचारादरम्यान खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी दिलेली बैलगाडा शर्यत बंदी उठवणार, बायपास रस्त्यांची व राष्ट्रीय महामार्गांची कामे मार्गी लावणार या ३ प्रमुख आश्वासनांची त्यांनी केलेली पूर्तता आणि विविध प्रकल्पांसाठी केलेल्या पाठपुराव्याचा सविस्तर घटनाक्रम सांगणारा 'विकासपर्व' हा कार्य अहवाल प्रकाशित करुन मागील ५ वर्षात काय केलं याची आढावा मतदारांसमोर मांडला आहे.निवडणूक प्रचारात मतदारांना बैलगाडा शर्यत बंदी उठविण्याचे तसेच रखडलेल्या बायपास रस्त्यांची कामे आणि राष्ट्रीय महामार्गांची कामे मार्गी लावणार अशी ३ प्रमुख आश्वासने दिली होती. त्यानुसार बैलगाडा शर्यत बंदी उठविण्यात यश मिळाले असून बैलगाडा शर्यती सुरु झाल्या आहेत. त्याचबरोबर नारायणगाव, कळंब, मंचर, खेडघाट आणि राजगुरुनगर या ५ बायपासची कामे पूर्ण होऊन वाहतुकीसाठी खुले झाले आहेत तर आळेफाटा बायपासचे काम प्रगतीपथावर आहे. मागील निवडणुकीत सर्वात कळीचा मुद्दा ठरलेल्या नाशिकफाटा ते चांडोली, तळेगाव चाकण शिक्रापूर आणि पुणे शिरुर या तीनही राष्ट्रीय महामार्गावर एलिव्हेटेड कॉरिडॉर बांधण्यासाठी मंजुरी मिळाली असून या तीनही महामार्गाच्या एकूण १९१३७.३६ कोटींच्या कामांची निविदा प्रक्रिया सुरू आहे. या सर्व कामांच्या पाठपुराव्याची घटनाक्रमासह माहिती या कार्य अहवालात नमूद करण्यात आली आहे.या आश्वासनांबरोबरच खासदार डॉ. कोल्हे यांनी चाकणला कामगार विमा योजनेचे रुग्णालय व्हावे यासाठी केलेले यशस्वी प्रयत्न, राज्य शासनाने मंजुरी दिलेला महत्वाकांक्षी इंद्रायणी मेडिसिटी प्रकल्प, शिवनेरी किल्ल्यावर रोपवे बांधण्यासाठी केंद्र सरकार आणि राज्य सरकार यांच्यात झालेला सामंजस्य करार, कुकडेश्वर मंदिराच्या कळसाच्या कामासाठी केलेल्या प्रयत्नांमुळे मंजूर झालेला निधी यासाठीच्या पाठपुराव्याचा सविस्तर प्रवास कार्य अहवालात मांडला आहे.आकर्षक सजावट असलेल्या आपल्या अहवालात खासदार डॉ. कोल्हे यांनी मतदारसंघातील कामे व विविध प्रकल्पांसाठी केलेल्या मतदारसंघात राष्ट्रीय वनौषधी संशोधन संस्था व्हावी यासाठी मिळालेली प्राथमिक मंजुरी, त्यानंतर त्याचा सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या माध्यमातून सादर केलेला सविस्तर डीपीआर, त्याचप्रमाणे गेल्या अनेक वर्षांपासून मतदारसंघातील जनतेने पाहिलेले पुणे नाशिक सेमी हायस्पीड रेल्वेचे स्वप्न पूर्ण व्हावे यासाठी जीव ओतून प्रयत्न केल्याचे त्यांनी दिलेल्या माहितीवरून जाणवते.

# बारणे यांच्या हस्ते दहा कोटींच्या कामांचे भूमीपूजन

## किवळे-विकासनगर भागातील अंतर्गत रस्ते होणार सिमेंट काँक्रीटचे



**। पिंपरी-चिंचवड । न्यूज एक्सप्रेस मराठी।** पिंपरी चिंचवड महापालिकेचे शेवटचे टोक असलेल्या आणि विकास कामांपासून काहीसे दूर राहिलेल्या किवळे-विकासनगर भागातील अंतर्गत रस्ते सिमेंट काँक्रीटचे होणार आहेत. खासदार श्रीरंग बारणे यांच्या स्थानिक विकास आणि नगरविकास विभागाच्या निधीतून दहा कोटी रुपयांच्या सिमेंट काँक्रीटच्या रस्त्यांचे भूमीपूजन खासदार बारणे यांच्या हस्ते झाले. तसेच विकासनगर येथील मुख्य रस्त्यांची १५ कोटींची निविदा प्रसिद्ध झाली आहे. लवकरच कामाला सुरुवात होणार आहे.याप्रसंगी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख बाळासाहेब वाल्हेकर, शहरप्रमुख निलेश तरस, युवा सेना जिल्हाप्रमुख राजेंद्र तरस, सुनिता चंदने, धर्मपाल तंतरपाळे आदी पदाधिकारी उपस्थित होते. भागातील महिला, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. किवळे-विकासनगर भागातील रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात खड्डे पडले होते. त्यामुळे नागरिकांचे हाल होते. रस्त्यांचा विकास करण्याची अनेक वर्षांपासून नागरिकांची मागणी होती. नागरिकांचा पाठपुरावा सुरु होता. शिवसेनेचे शहरप्रमुख निलेश तरस, युवा सेनेचे जिल्हाप्रमुख राजेंद्र तरस यांनी रस्त्यांसाठी निधी देण्याची मागणी केली. त्यानुसार नगरविकास विभाग आणि स्थानिक खासदार निधीतून दहा कोटी रुपयांच्या रस्ते कामांचा शुभारंभ करण्यात आला. किवळे भागातील नागरिकांना यामुळे अनेक पायाभूत सुविधा उपलब्ध होणार आहे. खासदार श्रीरंग बारणे म्हणाले की, खासदार स्थानिक विकास निधी मोठ्या प्रमाणात रस्त्यांसाठी खर्च केला आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी देखील नगरविकास विकास विभागाच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात निधी दिला. या निधीतून पिंपरी-चिंचवड शहरातील अंतर्गत रस्त्यांची कामे केली. आवश्यक त्या भागात रस्ते केले. त्यासाठी महापालिकेचेही सहकार्य लाभते. दर्जेदार, वेळेत काम पूर्ण करण्याच्या सूचना ठेकेदाराल्या दिल्या आहेत. शहरातील विकासावर, चालू असलेल्या विकास कामांच्या दर्जावर माझे बारकाईने लक्ष असते. शहरातील पाणी, रस्ते, वीज या समस्या मार्गी लावण्याचे काम केले जाते. किवळे भागातील कमी दाबाने पाणी येण्याची समस्याही मार्गी लावली जाईल. आगामी काळात मुळशी धरणातून अतिरिक्त पाण्याचा साठा शहरासाठी मिळणार आहे. त्यानंतर पाण्याची समस्या उद्भवणार नाही. विकासनगर येथील मुख्य रस्त्याचे काम करण्याची नागरिकांची अनेक दिवसांपासूनची मागणी होती. त्या कामाची १५ कोटींची निविदा देखील प्रसिद्ध झाली आहे. लवकरच निविदा प्रक्रिया पूर्ण होईल आणि कामाला सुरुवात होईल असेही खासदार बारणे यांनी सांगितले.

# उद्धव ठाकरे यांची गर्जना मशाल पेटवा, गद्दारी गाडा

## मावळ मतदार संघावर पुन्हा भगवा फडकवण्याची घोषणा

**। पिंपरी-चिंचवड । न्यूज एक्सप्रेस मराठी।** मावळ लोकसभेवर पुन्हा भगवा फडकाविण्यासाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते उद्धव ठाकरे यांनी मावळ लोकसभा मतदार संघाच्या दौऱ्यावर असताना पनवेल येथील सभेत संजोग वाघेरे यांना उमेदवारी जाहीर केली. शिवसेना पक्ष आणि पक्ष चिन्ह शिंदे गटाला गेल्यानंतर ही पहिलीच निवडणूक असणार आहे. यावेळी ठाकरे यांनी मावळ मतदार संघावर पुन्हा भगवा फडकवण्याची घोषणा केली.सोमवार (दि.०४) रोजी उद्धव ठाकरे यांची मावळ लोकसभा मतदरसंघात पनवेल, खोपोली, उरण या तीन ठिकाणी सभा घेतल्या. सुरुवातीला हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे लॉ कॉलेजचे उद्घाटन केल्यानंतर पनवेल येथे सभा घेण्यात आली. यावेळी पिंपरी चिंचवडचे माजी महापौर संजोग वाघेरे यांच्या उमेदवारी घोषित करून मावळ मतदार संघावर पुन्हा भगवा फडकवणार असे म्हटले आहे.



मावळ लोकसभेचे खासदार श्रीरंग बारणे हे एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत आहेत. मावळ लोकसभा स्थापनेपासून शिवसेनेचा सलग १५ वर्ष खासदार निवडून येत आहे. आता शिवसेनेचे दोन भागात विभागणी झाल्यानंतर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या पक्षाने मावळ लोकसभेवर पुन्हा भगवा फडकवण्यासाठी जोरदार तयारी सुरू केली आहे. नुकतेच राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटातून आलेले माजी महापौर संजोग वाघेरे यांना शिवसेना ठाकरे गटाकडून या लोकसभा मतदारसंघात उमेदवारी जाहीर करत कामाला लागण्याचे आदेश पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी आज तमाम शिवसैनिकांना दिले आहेत.मावळ लोकसभेतील मतदार सुरुवातीपासूनच ठाकरे घराण्याची विचाराशी ठाम राहिले आहेत. शिवसेनेचे मोठे वलय आहे. राज्यात राजकीय सत्ता नाट्यानंतर उद्धव ठाकरे यांच्या सोबतीला राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष-शरदचंद्र पवार, राष्ट्रीय काँग्रेस, शेकाप अशा विविध पक्षांचा पाठिंबा मिळणार आहे. २००९ साली घाटाखालील तीन पनवेल, कर्जत-खालापूर व उरण तीन विधानसभा आणि घटावरती पिंपरी, चिंचवड व मावळ तीन विधानसभा मतदारसंघ आहेत. मावळ लोकसभा मतदारसंघ निर्माण झाला तेव्हापासून शिवसेनेचा भगव्याने हॅट्रिक केली आहे. आता महायुती विरोधात महायुतीकडून संजोग वाघेरे यांच्या रूपात तगडे आव्हान उभे करून शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने मावळ वरती पुन्हा भगवा फडकवण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.

# सुप्रिया सुळेंच्या प्रचारार्थ युगेंद्र पवार मैदानात

## दहशतीचे वातावरण असेल तर माझ्याशी संपर्क करा

**पुणे ।**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**
''बारामतीत दहशतीचा आणि वेगळ्या प्रकारचे राजकारण असेल तर माझ्याशी संपर्क करा, मग मी बघतो'', असे म्हणत उपमुख्यमंत्री अजित पवारांच्याविरोधात सख्ख्या पुतण्यानेचं म्हणजेच युगेंद्र पवार यांनी दंड थोपटले आहेत. युगेंद्र पवारांनी खासदार सुप्रिया सुळेंच्या प्रचारार्थ गावभेट दौरे सुरु केले आहेत. उंडवडीत त्यांनी ग्रामस्थांशी संवाद साधला यावेळी ते बोलत होते.सुप्रिया सुळे यांच्या गटासोबत असणाऱ्या कार्यकर्त्यांना धमकावले जात असल्याची चर्चा सध्या बारामती सुरु आहे. त्या पार्श्वभूमीवर युगेंद्र पवारांनी विरोधकांना आव्हान दिलं आहे. बारामतीत वेगळ्या प्रकारचं राजकारण होत





आहे. बारामतीकरांनी असे दहशतीचं राजकारण कधी बघितलं नाही. कोणी तुम्हाला फोन करून धमकावले जात असेल तर थेट माझ्याशी संपर्क करा, पुढचं मी बघतो, असं युगेंद्र पवार यांनी म्हटलं आहे. बारामती लोकसभा मतदारसंघात पहिल्यांदा पवार विरुद्ध पवार अशी लढाई पाहायला मिळणार आहे. अजित पवार गटाकडून बारामती लोकसभेसाठी सुनेत्रा पवार यांना उमेदवार देण्यात येणार असल्याचे निश्चित आहे. तर दुसरीकडे शरद पवार गटाकडून सुप्रिया सुळे मैदानात उतरणार आहेत. दरम्यान, अजित पवार यांचे पुतणे युगेंद्र पवार सुप्रिया सुळे यांच्या प्रचारार्थ मैदानात उतरले आहेत.युगेंद्र पवार यापूर्वी कधीही राजकारणात सक्रिय नव्हते. शिवाय, त्यांच्या नावाच्या चर्चा देखील पाहायला मिळत नव्हत्या. मात्र, शरद पवार समवेत एका कार्यक्रमात त्यांनी हजेरी लावली. त्यानंतर ते चर्चेत आले. दरम्यानच्या काळात बऱ्याच घडामोडी घडल्या आणि आता ते सुप्रिया सुळे यांच्या प्रचारार्थ मैदानात उतरले आहेत. अजित पवार यांचे धाकटे बंधू श्रीनिवास पवार यांचे युगेंद्र पवार चिरंजीव आहेत. युगेंद्र पवार हे विद्या प्रतिष्ठान शिक्षण संस्थेचे खजिनदार आहेत.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बंडखोरी केल्यानंतर राष्ट्रवादीत दोन गट पडले. त्यानंतर निवडणूक आयोगाने राष्ट्रवादी काँग्रेस हे नाव आणि घड्याळ हे चिन्ह अजित पवार यांच्या गटाला दिलं. तर शरद पवार यांच्या गटाला तुतारी हे चिन्ह आणि 'राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार' हे नाव दिलं. त्यामुळे दोन गट तर पडलेच. मात्र, पवार कुटुंबातील महिलांमध्येच लोकसभेच्या निवडणुकीसाठी चूरस पाहायला मिळणार आहे. बारामती लोकसभा मतदारसंघात पहिल्यांदा पवार विरुद्ध पवार अशी लढाई पाहायला मिळणार आहे. अजित पवार गटाकडून बारामती लोकसभेसाठी सुनेत्रा पवार यांना उमेदवार देण्यात येणार असल्याचे निश्चित आहे. तर दुसरीकडे शरद पवार गटाकडून सुप्रिया सुळे मैदानात उतरणार आहेत. दरम्यान, अजित पवार यांचे पुतणे युगेंद्र पवार सुप्रिया सुळे यांच्या प्रचारार्थ मैदानात उतरले आहेत.युगेंद्र पवार यापूर्वी कधीही राजकारणात सक्रिय नव्हते. शिवाय, त्यांच्या नावाच्या चर्चा देखील पाहायला मिळत नव्हत्या. मात्र, शरद पवार समवेत एका कार्यक्रमात त्यांनी हजेरी लावली. त्यानंतर ते चर्चेत आले. दरम्यानच्या काळात बऱ्याच घडामोडी घडल्या आणि आता ते सुप्रिया सुळे यांच्या प्रचारार्थ मैदानात उतरले आहेत. अजित पवार यांचे धाकटे बंधू श्रीनिवास पवार यांचे युगेंद्र पवार चिरंजीव आहेत. युगेंद्र पवार हे विद्या प्रतिष्ठान शिक्षण संस्थेचे खजिनदार आहेत. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बंडखोरी केल्यानंतर राष्ट्रवादीत दोन गट पडले. त्यानंतर निवडणूक आयोगाने राष्ट्रवादी काँग्रेस हे नाव आणि घड्याळ हे चिन्ह अजित पवार यांच्या गटाला दिलं.

# साखर कारखान्यांनी दोन हजार कोटींची एफआरपी थकविली

## ११४ कारखान्यांकडे सुमारे दोन हजार कोटी रुपयांची रक्कम थकीत

**पुणे ।**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**
राज्यातील २०६ पैकी ११४ कारखान्यांकडे सुमारे दोन हजार कोटी रुपयांची रास्त आणि किफायतशीर दराची (एफआरपी) रक्कम थकीत आहे. इथेनॉल उत्पादन, साखर निर्यातीवरील निर्बंध कायम आहेत. तसेच साखरेचा किमान विक्री दर स्थिर ठेवल्यामुळे कारखाने आर्थिक अडचणीत आले आहेत.राज्यात यंदाच्या गळीत हंगामात २०६ कारखाने सुरू आहेत. या



कारखान्यांनी ८२४.८० लाख टन उसाचे गाळप केले आहे. त्यापोटी एकूण देय एफआरपी २५,५०६ कोटी रुपये आहे. कारखान्यांनी फेब्रुवारीअखेर एफआरपी २३,४४१ कोटी रुपयांची एफआरपी दिली आहे. अद्यापही ११४ साखर कारखान्यांकडे २०६५ कोटी रुपयांची एफआरपी थकीत आहे.यंदाच्या हंगामात इथेनॉल उत्पादनावर निर्बंध आहेत. साखरेच्या निर्यातीवर निर्बंध आहेत. साखरेचा किमान साखर विक्री प्रति किलो ३१ रुपयांवर स्थिर आहे. अशा अवस्थेत केंद्र सरकारने १०.२५ टक्के साखर उतारा असलेल्या कारखान्यांना प्रति ३४०० रुपये एफआरपी देण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळे साखर कारखान्यांची कोंडी झाली आहे. एफआरपीची रक्कम देण्यासाठी कारखान्यांना कर्ज काढावे लागत आहे. राज्य सहकारी बँकेकडून कारखान्यांना साखर तारण कर्ज दिले जाते. बँकेने बाजारात साखरेचे दर घटल्यामुळे साखरेच्या मूल्यांकनात प्रति क्विंटल १०० रुपयांची घट केली आहे. बँक आता प्रति क्विंटल २९७० रुपये इतकी उचल देणार आहे. त्यामुळे कारखान्यांची आर्थिक कोंडी झाल्याची स्थिती आहे.इथेनॉल निर्मितीवर, साखर निर्यातीवर निर्बंध आहेत. साखरेचा किमान विक्री दर वाढविलेला नाही. कारखाने आर्थिक अडचणीत असताना केंद्र सरकारने ३४०० रुपये प्रति टन एफआरपी देण्याचे आदेश दिले आहेत. केंद्र सरकारने तातडीने साखरेचा विक्री दर न वाढविल्यास राज्यातील संपूर्ण साखर कारखानदारीच अडचणीत येणार आहे.

# मोनोरेल प्रकल्पावरून भाजपमध्ये वादाची ठिणगी?

## खासदार मेधा कुलकर्णी यांचा विरोध; माजी महापौर मुरलीधर मोहोळ आग्रही



**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** कोथरूड येथील थोरात उद्यानातील प्रस्तावित मोनोरेल प्रकल्पावरून शहर भाजपमध्ये वादाची ठिणगी पडली आहे. खासदार मेधा कुलकर्णी यांनी नागरिकांना पाठिंबा दर्शवित या प्रकल्पाला विरोध दर्शविला आहे, तर माजी महापौर, भारतीय जनता पक्षाचे प्रदेश सरचिटणीस मुरलीधर मोहोळ या प्रकल्पासाठी आग्रही आहेत. कोथरूड येथील थोरात उद्यानात खुली व्यायामशाळा, योग केंद्र, विरंगुळा केंद्र, वॉकिंग ट्रॅक, डायनासोर पार्क यासाठी बांधकाम केल्यानंतर आता प्रस्तावित मोनो रेल प्रकल्पासाठी उद्यानात मोठ्या प्रमाणावर खांब उभारण्यात येणार आहेत. तसेच या प्रकल्पासाठी उद्यानात बांधकाम करण्यात येणार असल्याने मोनो रेलला उद्यानप्रेमींकडून विरोध सुरू झाला आहे.उद्यानामध्ये ७२ व्होल्ट डिसी बॅटरी ऑपरेटेड मोनोरेल उभारण्यात येणार आहे. दोन डब्यांची ही मोनोरेल असून त्यासाठी ४१० आरएमटी ट्रॅक, सुरक्षा रेलिंग, प्लॅटफॉर्म तिकीट कक्षासाठी बांधकाम करण्यात येणार आहे. हे काम कोलकाता येथील ब्रँथवेट कंपनीला देण्यात आले असून पुढील महिन्याभरात मोनोरेलेचे काम सुरू होण्याची शक्यता आहे. मात्र दहा फूट उंचीवरून जाणाऱ्या मोनो रेलसाठी सुमारे सत्तर खांबांची उभारणी उद्यानात करण्यात येणार आहे. त्यामुळे उद्यानात चालायचे कसे? असा प्रश्न उद्यानप्रेमींकडून उपस्थित करण्यास सुरुवात झाली असून या प्रकल्पाविरोधात स्थानिक एकवटले आहेत. या प्रकल्पाविरोधात नागरिकांनी कृती समिती स्थापन केली असून प्रकल्पासंदर्भात चर्चा करण्यासाठी कृती समितीने लोकप्रतिनिधी आणि राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींना चर्चेसाठी आमंत्रित केले होते. त्याला उपस्थित रहात कुलकर्णी यांनी नागरिकांच्या लढ्याला पाठिंबा दर्शविला आहे.माजी महापौर, भारतीय जनता पक्षाचे प्रदेश सरचिटणीस मुरलीधर मोहोळ या प्रकल्पासाठी आग्रही आहेत. नगरसेवक असताना त्यांनी हा प्रकल्प मंजूर करून घेतला होता. मात्र कृती समितीने यासंदर्भातील त्यांची भूमिका स्पष्ट केली आहे. नागरिकांची मागणी नसताना प्रकल्प लादणे अयोग्य आहे. कृती समितीने व्यक्त केलेली चिंता योग्य आहे. त्यामुळे त्यांच्या मागणीला पाठिंबा आहे, अशी भूमिका कुलकर्णी यांनी घेतली आहे. वेताळ टेकडी फोडून प्रस्तावित करण्यात आलेल्या बालभारती पौड रस्त्यालाही कुलकर्णी यांनी विरोध दर्शविला होता. कोथरूडचे आमदार चंद्रकांत पाटील या प्रकल्पासाठी आग्रही होते. मात्र पर्यावरणाला हानी पोहोचविणाऱ्या प्रकल्पांना विरोधच असेल, असे कुलकर्णी यांनी स्पष्ट केले होते. आता कोथरूड मधील मोनोरेल प्रकल्पासंदर्भाही त्यांनी नागरिकांच्या बाजूने भूमिका घेतली आहे. नातील प्रस्तावित मोनोरेल प्रकल्पावरून शहर

भाजपमध्ये वादाची ठिणगी पडली आहे. खासदार मेधा कुलकर्णी यांनी नागरिकांना पाठिंबा दर्शवित या प्रकल्पाला विरोध दर्शविला आहे, तर माजी महापौर, भारतीय जनता पक्षाचे प्रदेश सरचिटणीस मुरलीधर मोहोळ या प्रकल्पासाठी आग्रही आहेत. कोथरूड येथील थोरात उद्यानात खुली व्यायामशाळा, योग केंद्र, विरंगुळा केंद्र, वॉकिंग ट्रॅक, डायनासोर पार्क यासाठी बांधकाम केल्यानंतर आता प्रस्तावित मोनो रेल प्रकल्पासाठी उद्यानात मोठ्या प्रमाणावर खांब उभारण्यात येणार आहेत. तसेच या प्रकल्पासाठी उद्यानात बांधकाम करण्यात येणार असल्याने मोनो रेलला उद्यानप्रेमींकडून विरोध सुरू झाला आहे.उद्यानामध्ये ७२ व्होल्ट डिसी बॅटरी ऑपरेटेड मोनोरेल उभारण्यात येणार आहे. दोन डब्यांची ही मोनोरेल असून त्यासाठी ४१० आरएमटी ट्रॅक, सुरक्षा रेलिंग, प्लॅटफॉर्म तिकीट कक्षासाठी बांधकाम करण्यात येणार आहे.

# राज्य सरकार देणार गोशाळांना अनुदान

## ३२४ तालुक्यांतील १७८ गोशाळांना २२ कोटी ८३ लाख रुपयांचे अनुदान

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** राज्यातील ३२४ तालुक्यांतील १७८ गोशाळांना २२ कोटी ८३ लाख रुपयांचे अनुदान देण्यात येणार आहे. गोवर्धन गोवंश समिती योजनेंतर्गत २०२३-२४ या वर्षात पात्र ठरलेल्या गोशाळांना हे अनुदान पशुसंवर्धन विभागाकडून दिले जाणार आहे, अशी माहिती महाराष्ट्र गोसेवा आयोगाचे अध्यक्ष शेखर मुंदडा यांनी दिली. आयोगाच्या कार्यालयात आयोजित कार्यशाळेत ते बोलत होते. कार्यशाळेला आयोगाचे सदस्य सुनील सूर्यवंशी, संजय भोसले, सनतकुमार गुप्ता, पशुसंवर्धन विभागाचे सहायक आयुक्त प्रकाश अहिरराव, उपायुक्त भागवत देशमुख उपस्थित होते.

मुंदडा म्हणाले, की



गोवर्धन गोवंश समिती योजनेंतर्गत २०२३-२४ या वर्षासाठी पात्र असलेल्या राज्यातील ३२४ तालुक्यांतील १७८ गोशाळांना एकूण २२ कोटी ८३ लाख रुपयांचे अनुदान देण्यात येणार आहे. गोशाळा सक्षम करण्यासाठी ही मदत अत्यंत उपयोगी ठरणार आहे. १७८ पैकी ४० गोशाळांना प्रत्येकी १५ लाख रुपये, ५३ गोशाळांना प्रत्येकी २० लाख रुपये आणि ८५ गोशाळांना प्रत्येकी २५ लाख रुपये अनुदान देण्यात येणार आहे. योजनेंतर्गत प्राप्त होणारे अनुदान कोणत्या बाबींवर खर्च करावे. अनुदानाचे नियम, मिळालेले अनुदान वापरायचे निकष आदी सर्व बाबी समजून सांगण्यासाठी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. चालू आर्थिक वर्षात योजनेची परिणामकारकरीत्या अंमलबजावणी करण्यात येणार आहे.राज्यात गोवंशाची एकूण संख्या एक कोटी ३९ लाख आहे. त्यातील देशी गोवंशाची संख्या १३ लाख आहे. या देशी गोवंशाचा सांभाळ करताना एकही गाय कत्तलखान्यात जाणार नाही, हे लक्ष्य ठेवून गोसेवा आयोगाचे काम सुरू आहे. काही गोशाळा या 'स्मार्ट गोशाळा' म्हणून विकसित केल्या जाणार आहेत.